**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे**
**कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर**
**५३९, कसबा करवीर राजेंद्र नगर कोल्हापूर- ४१६ ००४**

क्र.कोविमं/ उमा./ प्रात्य/ ऑनलाईन/3043
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक - ०५/०३/२०२२

प्रति,
प्राचार्य,
सातारा / सांगली / कोल्हापूर,
मार्च/एप्रिल २०२२,
माहिती तंत्रज्ञान,ऑनलाईन परीक्षा घेणारी
कनिष्ठ महाविद्यालये.

**विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च/एप्रिल २०२२ साठी "माहिती तंत्रज्ञान" (आय.टी.) विषयाच्या ऑनलाईन परीक्षेबाबत..**

संदर्भ- क्र.रा.मं./ ऑनलाईन /आय. टी./ जी.के./ ११७८, दिनांक ०३ मार्च, २०२२ चे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च/एप्रिल २०२२ परीक्षेच्या वेळापत्रकातील अंशत: बदलाबाबतच्या प्रकटनामध्ये शनिवार दिनांक ०५ मार्च, २०२२ रोजी होणाऱ्या प्रथम व द्वितीय सत्रातील भाषा विषयाच्या परीक्षा मंगळवार दिनांक ०५ एप्रिल, २०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या आहेत. मूळ वेळापत्रकानुसार इयत्ता १२ वी माहिती तंत्रज्ञान(आय.टी.) या विषयाची परीक्षा दिनांक ३१ मार्च २०२२, ०१ व ०४ एप्रिल, २०२२ रोजी सकाळच्या व दुपारच्या सत्रात आयाजित करण्यात आली आहे. दिनांक ०५ एप्रिल, २०२२ रोजी पुर्नपरीक्षेची संधी उपल्बध करून देण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत सदर प्रकटनातील दिनांक ०५ मार्च, २०२२ रोजीच्या हिंदी (०४), जर्मन (१४), जपानी (२१), चिनी (२६) व पर्शियन (३७) या भाषा विषयांच्या परीक्षेच्या दिनांकाच्या बदलामुळे, (दिनांक ०५ एप्रिल, २०२२ रोजी सदर परीक्षा होणार आहे.) या विषयांची परीक्षा व माहिती तंत्रज्ञान(आय.टी.) या विषयाची पुर्नपरीक्षेची संधी दोन्हीही दिनांक ०५ एप्रिल, २०२२ रोजी एकाच दिवशी येत आहे. काही विद्यार्थ्यांनी उपरोक्त नमूद भाषा आणि माहिती तंत्रज्ञान(आय.टी.) एकत्रित घेतले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, जे विद्यार्थी अपरिहार्य तांत्रिक व्यत्यय अन्य कारणांमुळे तसेच उपरोक्तप्रमाणे दिनांकाच्या बदलामुळे सदर परीक्षा देउ शकणार नाहीत. अशा विद्यार्थ्यांना **दिनांक ०५ रोजी आणि उर्वरित विद्यार्थ्यांना दिनांक ०६ एप्रिल, २०२२** रोजी याप्रमाणे दोन्ही दिवशी पुर्नपरीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. याची नोंद घ्यावी. तसेच सर्व विद्यार्थ्यांना सदर बाब निदर्शनास आणून द्यावी.

(सत्यवान सोनवणे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

: d/Jadhav Minakshi/Paripatrak pg. 27